व्हिजन न्यू इंडिया
नवभारत नवनिर्मितीचे स्वप्न...

पुढारी
वर्धापनदिन विशेषांक
कोल्हापूर
सोमवार, १ जानेवारी २०१८


# भारत ही तरुणांची महासत्ता असेल







**सर्वसमावेशकता ही भारतीय उच्च शिक्षणाची सर्वात महत्त्वाची बाजू आहे. येत्या दशकात भारत ही जगातील सर्वाधिक तरुण महासत्ता असेल, हे गृहीत धरून आणि या महासत्तेच्या प्रस्थापनेत इथल्या तरुणांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे. किंबहुना, त्यांच्या बळावरच आपण महासत्ता होण्याची स्वप्ने बाळगत आहोत. ही बाब लक्षात घेऊन पंतप्रधानांनी अत्यंत दूरदृष्टीने सर्व उपक्रम व कार्यक्रमांची घोषणा केली आहे.**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू
डॉ. देवानंद शिंदे यांची मुलाखत

**प्रश्न :** अमेरिका आणि चीन यांच्या खालोखाल एक व्यापक शिक्षण व्यवस्था म्हणून भारताचा तिसरा क्रमांक लागतो. या व्यापक आणि सक्षम उच्च शिक्षण व्यवस्थेची कोणती वैशिष्ट्ये सांगाल?

**उत्तर :** सर्वसमावेशकता हे भारतीय शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. येथील शिक्षण व्यवस्था ही प्राथमिक स्तरापासून ते उच्च शैक्षणिक स्तरापर्यंत खालून वर अशा पद्धतीने उत्क्रांत होत गेलेली आहे. एकाचवेळी आडवी व उभी (होरिझंटल आणि व्हर्टिकल) अशाप्रकारची शैक्षणिक वृद्धी करण्याचे आव्हान आपल्या धोरणकर्त्यांसमोर होते. ते त्यांनी यशस्वीपणे पेललेले आहे. त्याचप्रमाणे विस्तार (एक्स्टेंशन आणि एक्सपांशन) बहुविद्याशाखीय अप्रोच आणि संशोधनविषयक कार्याच्या प्रेरणा हीसुद्धा वैशिष्ट्ये आहेत.

**प्रश्न :** आज भारतात शिक्षणाचा विस्तार सर्व ठिकाणी झाला असूनही उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अत्यल्प प्रमाणाची कोणती कारणे आहेत?

**उत्तर :** भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील विषमता हा आपल्या व्यवस्थेसमोरील चिंतेचा विषय आहे; पण याकडे सखोल दृष्टीने पाहिले तर काही गोष्टी स्पष्ट होतील.

भारत स्वतंत्र झाला. त्यावेळी येथे केवळ २० विद्यापीठे, ५०० महाविद्यालये आणि अवघे एक लाख विद्यार्थी उच्च शिक्षण घेत होते. म्हणजे साधारण १९५० च्या दशकात नवस्वतंत्र भारतातील कोट्यवधी नागरिकांपैकी मूठभर उच्चभ्रू विद्यार्थ्यांनाच उच्च शिक्षण घेता येत होते. गोरगरीब जनता, मध्यमवर्ग यातील बहुतांश जनता ही शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासूनच वंचित होती. त्यांना या प्रवाहात सामील करून घेऊन देशाच्या प्रगतीमध्ये, विकासामध्ये भागीदार करवून घेणे ही आपली प्राथमिक जबाबदारी होती. त्या दिशेने आपण पावले टाकायला सुरुवात केली.

गेल्या ७० वर्षांच्या वाटचालीत आपल्या विद्यापीठांची संख्या आठशेच्या घरात, महाविद्यालयांची संख्या ४० हजारांच्या घरात आणि याव्यतिरिक्त स्वतंत्रपणे कार्य करणाऱ्या संस्था अकरा हजारांच्या घरात अशी विस्तारली आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्याही आता साडेतीन कोटींच्या घरात पोहोचली आहे. महिला, दलित, शेतकरी, मागासवर्गीय व अन्य धार्मिक व सामाजिक कारणांनी शिक्षणापासून वंचित असणारे विद्यार्थी उच्च शिक्षण घेताहेत. तरीसुद्धा आजही भारतातील ७५ टक्के विद्यार्थी उच्च शिक्षणाच्या प्रवाहात पोहोचत नाहीत. यातील प्रवेशाचे प्रमाण वाढवण्यासाठी सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न :** भारतातील उच्च शिक्षणाच्या स्ट्रेंथस् आणि त्याच्या मर्यादा कोणत्या आहेत असे तुम्हाला वाटते? पुस्तकी शिक्षण आणि व्यावहारिक जग याबाबतचा फरक कसा विशद कराल?

**उत्तर :** मी सुरुवातीला म्हणालो, त्याप्रमाणे सर्वसमावेशकता ही भारतीय उच्च शिक्षणाची सर्वात सशक्त बाजू आहे. भारतात जवळजवळ हरेक विद्याशाखांतील विविध प्रकारच्या विषयांतील अद्ययावत उच्च शिक्षण उपलब्ध आहे. तितक्याच विषयांमध्ये स्पेशलायझेशन करण्याची संधीही उपलब्ध आहे. स्पेशलायझेशनच्या सुरुवातीच्या टप्प्यावर त्याला त्या विषयाशी निगडित विविध विद्याशाखांची किमान मूलभूत माहिती असावी, अशा पद्धतीने त्याची रचना आहे. (उदा., अभियांत्रिकी शाखेत विद्यार्थ्यांचे स्पेशलायझेशन कोणतेही असो, पहिल्या वर्षी त्याला अभियांत्रिकीच्या सर्व मूलभूत शाखांचे ज्ञान दिले जाते.)

प्रोफेशनल पद्धतीने विकासासाठीच्या शिक्षण संधीही आपल्याकडे उपलब्ध आहेत. उदा., विविध भाषा, विविध संगणकीय प्रोग्रामिंगचे शिक्षण, संबंधित विद्याशाखा, विषय यांच्याशी निगडित कायदेशीर बाबी, नैतिक बाबींशी विद्यार्थ्यांना अवगत केले जाते, हीसुद्धा सशक्त बाजूच आहे.

मर्यादांच्या बाबतीत बोलायचे, तर आपली लोकसंख्या विचारात घेता, ज्या प्रमाणात शिक्षणाच्या संधी उपलब्ध आहेत. त्या प्रमाणात रोजगार संधीची उपलब्धता होत नाही, हे मान्य करावे लागेल. तसेच सध्या घेत असलेल्या शिक्षणाचा पुढे नेमका कशा पद्धतीने व्यावसायिक वापर करावयाचा, याविषयीचा विचार व दिशा देण्यात आपण कमी पडत आहोत. मात्र, त्यावर उपाय म्हणून आता उच्च शिक्षण संस्था आणि विविध उद्योगसमूह, व्यावसायिक आस्थापना यांच्याशी परस्पर सहचर्य वाढवून व्यवसाय व रोजगार संधी वाढविण्याकडेही कल वाढतो आहे, हे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न :** आज आपल्याकडे असंख्य विद्यापीठे आहेत. देशातील सर्वाधिक महाविद्यालये महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रात एकूण ३७ संशोधन संस्था आहेत. अनेक अभिमत विद्यापीठे आहेत, तरीही महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा दर्जा भारतात सर्वोत्तम आहे, असे अनेक शिक्षणतज्ज्ञांना वाटत नाही याचं कारण काय?

**उत्तर :** कोणत्या शिक्षणतज्ज्ञांना काय वाटते, याविषयी मला काही बोलावयाचे नाही. मात्र, उच्च शिक्षण घेण्यासाठी महाराष्ट्राकडे देशभरातील विद्यार्थ्यांचा सर्वाधिक ओघ आणि कल आहे ही वस्तुस्थिती आहे, इतकेच मी सांगेन.

दर्जाच्या बाबतीतही सांगायचे झाल्यास, 'नॅक'चे मूल्यांकन करवून घेण्यात महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि महाविद्यालये अग्रेसर आहेत. त्यातही 'अ' मानांकित शिक्षण संस्थांची संख्याही अन्य राज्यांच्या तुलनेत लक्षणीय आहे, या वस्तुस्थितीकडे मी निर्देश करू इच्छितो.

सर्वच विद्यापीठांना आज ना उद्या, याचप्रकारे संशोधनास प्रोत्साहन द्यावे लागेल, तसेच या संशोधनाला कौशल्य विकास उपक्रमांचीही जोड द्यावी लागेल.

**प्रश्न :** भारतात कौशल्यधारी मनुष्यबळाची गरज प्रतिवर्षी काही लाखांच्या घरात आहे आणि विविध कौशल्याचे शिक्षण देणाऱ्या संस्था मात्र अतिशय कमी आहेत. त्यातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांकडे उत्तम पुस्तकी ज्ञान आहे; पण प्रत्यक्ष कामाचा अनुभव नाही. या परिस्थितीवर आपण मात कशी करू शकतो?

**उत्तर :** मघाशी मी म्हटल्याप्रमाणे, विद्यार्थ्यांना पारंपरिक ज्ञानाबरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे सॉफ्ट आणि हार्ड स्कील्सचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. माझ्या शिवाजी विद्यापीठात आम्ही त्याप्रकारचे प्रयत्न केले आणि आम्हाला पान २ वर

## संशोधनाचा दर्जा उत्तम

वैज्ञानिक व भौतिक संशोधनाच्या बाबतीत आपल्या संशोधनाचा दर्जा अत्यंत उत्तम आहे आणि ते लगेच निर्धारित करता येते याचे कारण जागतिक स्तरावर त्यांची प्रकाशने आहेत. मानव्य विद्याशाखांच्या बाबतीत जागतिक प्रकाशनांची संख्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर त्याचे मूल्यमापन करण्यास मर्यादा पडतात. त्यासाठी स्थानिक भाषांबरोबरच आंतरराष्ट्रीय विशेषतः इंग्रजी भाषेतून मानव्य विद्याशाखांचे शोधनिबंध प्रकाशित करण्याला प्राधान्य देण्याची गरज आहे. आऊटकम बेस्ड रिसर्चवर भर देण्याची गरज आहे.




# भारत ही तरुणांची महासत्ता असेल

▶ पान १ वरून

त्यात चांगले यशही आले आहे. आम्ही सेंटर फॉर स्कील अँड आन्त्रप्रिन्युअरशिप डेव्हलपमेंटची स्थापना केली असून, त्या माध्यमातून कॅम्पसवर २५३ कौशल्ये, तर महाविद्यालयांत ४३ सीओसीच्या माध्यमातून एकूण ११,९७६ विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये प्रदान केली आहेत.

विद्यापीठात विशेष कौशल्य मेळा आयोजित करून त्या माध्यमातून सुमारे ११ हजार विद्यार्थ्यांना ८५ प्रकारची कौशल्ये प्रदान करण्यात आली. ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना अगदी ड्रायव्हिंगचे प्रशिक्षणही देण्यात आले. ज्यात मुलींची संख्याही लक्षणीय होती. डिजिटल इंडिया मोहिमेच्या जागृतीसाठी सुमारे १,७०० प्रशिक्षकांची टीम प्रशिक्षित करण्यात आली. त्यांच्या माध्यमातून विद्यापीठ परिसरातील विविध गावांत या उपक्रमांची माहिती देण्यात आली. प्रत्येक महाविद्यालय, विद्यापीठांनी आपापल्या स्तरावर अशाप्रकारचे उपक्रम राबविले, तर कोणीही विद्यार्थी कौशल्याविना राहणार नाही, असा मला विश्वास आहे.



**प्रश्न :** देशात प्रचंड मोठ्या प्रमाणावर उद्योगांची, व्यवसायांची, मोठ्या आणि लघु कारखानदारीची वाढ झाली आहे; पण त्यासाठी लागणारे कुशल मनुष्यबळ आपल्याकडे उपलब्ध नाही, ते निर्माण करण्यासाठी कोणते अपारंपरिक मार्ग, अपारंपरिक अभ्यासक्रम आपण उपयोगात आणले पाहिजेत? राबवले पाहिजेत?

**उत्तर :** यासाठी शिक्षण संस्था आणि व्यवसाय-उद्योग यांच्यात परस्पर संवाद निर्माण होण्याची मोठी गरज आहे. ही आंतरक्रियात्मकता व संवाद जितका वृद्धिंगत होईल, तितके आज हवे आहे. उद्योगांच्या परिसरातील शिक्षण संस्थांनी त्या-त्या उद्योगाच्या गरजा लक्षात घेऊन आपल्या शिक्षणक्रमांची आखणी करायला हवी. त्यांच्यात गरजेनुसार वेळोवेळी सुधारणा करायला हवी आणि त्या माध्यमातून हे कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळ स्थानिक पातळीवर उपलब्ध करण्याला प्राधान्य द्यावे.

इनक्युबेशन सेंटरसारख्या उपक्रमांना नजीकच्या काळात मोठे महत्त्व येणार आहे. शिवाजी विद्यापीठाने इंडो जर्मन टुलरूमच्या सहकार्याने अशा सेंटरची उभारणी कॅम्पसवर केली असून, त्या माध्यमातून अत्यल्प दरात अनेक प्रकारच्या कौशल्यांचे प्रदान विद्यार्थ्यांना करण्यात येत आहे. अशाप्रकारे विविध कौशल्य प्रदाते, तसेच प्रोफेशनल कंपन्या यांच्याशी सामंजस्य करार करून त्याद्वारेही असे कौशल्य विकास उपक्रम राबविता येऊ शकतील.

**प्रश्न :** गेल्या साडेतीन वर्षांत माननीय पंतप्रधानांनी अनेक नव्या कल्पना, नव्या योजना देशासमोर मांडल्या आहेत. 'यंग इंडिया', 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप' या सगळ्या योजना यशस्वी व्हायच्या असतील, तर भारतीय शिक्षण क्षेत्राला त्यासाठी काय करावे लागेल? याचा विचार तुम्ही कसा करता?

**उत्तर :** येत्या दशकात भारत ही जगातील सर्वाधिक तरुण महासत्ता आहे, हे गृहीत धरून आणि या महासत्तेच्या प्रस्थापनेत इथल्या तरुणांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे. किंबहुना, त्यांच्या बळावरच आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत. ही बाब लक्षात घेऊन पंतप्रधानांनी देशाच्या पुढील २५ वर्षांची वाटचाल डोळ्यांसमोर ठेवून अत्यंत दूरदृष्टीने या सर्व उपक्रम व कार्यक्रमांची घोषणा केली आहे. हे सर्व कार्यक्रम अत्यंत कृतिशील स्वरूपाचे आहेत. या कार्यक्रमांची रचना, संरचना आणि अंमलबजावणी प्रभावी पद्धतीने करण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी अभिनव योजना हाती घेण्याची गरज आहे. या योजनांमध्ये विद्यार्थ्यांना सामावून घेऊन त्यांना त्या स्वरूपाचे ज्ञान व प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यक्रम राबवावयाचे आहेत. हे पढीक स्वरूपाचे उपक्रम नसून, विद्यार्थ्यांना कृतिप्रवण करून त्यांना या उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रेरित करण्याची जबाबदारी शिक्षण क्षेत्रावर आहे.

**प्रश्न :** भारत ही जर सर्वांगीण महासत्ता व्हायची असेल, तर भारतीय शिक्षण आणि संशोधन यात नजीकच्या काळात कोणते बदल करावे लागतील?

**उत्तर :** भारतीय शिक्षण व्यवस्थेला संशोधन, माहिती-तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि व्यवस्थापन या चतुःसूत्रीचा आधार घेऊनच या पुढील काळात आपल्या धोरणांची आखणी करावी लागणार आहे.

**प्रश्न :** देशाच्या आर्थिक, औद्योगिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकासाचे रहस्य हे एकूण शिक्षण आणि संशोधन यात सामावलेले असते असे म्हटले जाते, ते भारताच्या संदर्भात किती खरे आहे?

**उत्तर :** अगदी शंभर टक्के. अगदी खालच्या स्तरापासून वरच्या स्तरापर्यंत अर्थात सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे समाजाच्या सर्व स्तरांत होरिझोंटल आणि व्हर्टिकल अशा दोन्ही पद्धतीने विकास घडवून आणण्यात शिक्षणाचे महत्त्व वादातीत आहे. केवळ भारतच नव्हे, तर जगातल्या कोणत्याही समृद्ध संस्कृतीच्या विकासाला ही बाब लागू होते.

**प्रश्न :** तुमच्या दृष्टीने कोणकोणत्या क्षेत्रांचा व्यावसायिक विकास पुढच्या पाव शतकात घडेल? कोणते नवे उद्योग उदयाला येतील आणि त्यासाठी कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम आपल्याला निर्माण करावे लागतील? तुम्ही शिवाजी विद्यापीठात या दृष्टीने कोणते प्रयत्न केले आहेत?

**उत्तर :** अन्नधान्य प्रक्रिया, अपारंपरिक ऊर्जा, ऑटोमोबाईल उद्योग, नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान. आपल्याला वेगळ्या अभ्यासक्रमांची नव्हे, तर वेगळ्या प्रशिक्षणाची गरज असून, त्या प्रकारच्या सुविधांची निर्मिती करण्याला प्राधान्य द्यावे लागेल. शिवाजी विद्यापीठात आम्ही त्यादृष्टीने आयजीटीआरसारख्या इन्क्युबेशन फॅसिलिटी उभारण्याला प्राधान्य दिले आहे. त्याचप्रमाणे इन्फोसिससारख्या नामांकित संस्थांसोबत सहकार्यवृद्धी करून त्यांच्या माध्यमातून शिक्षक, विद्यार्थ्यांना प्रोफेशनल ट्रेनिंग देण्यास प्राधान्य देतो आहोत.

11 JAN 2018
तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ देणार गुणात्मक संशोधनाला प्रोत्साहन

## २०१८-१९ वर्षात नॅकच्या सर्वोत्कृष्ट मानांकनासाठी तयारी: क्रीडा अधिविभागात होणार बदल, विद्यार्थी व नवोदित शिक्षकांना संशोधनासाठी निधी उपलब्ध होणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना संशोधनासाठी विविध सोयी-सुविधा उपलब्ध करून समाजोपयोगी संशोधन करण्याचा शिवाजी विद्यापीठाचा मानस आहे. यापुर्वी संशोधनामध्ये युजीसीने ८६ टक्के गुण दिले असून भविष्यात १०० टक्के गुण मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. यासाठी संख्यात्मक संशोधनापेक्षा गुणात्मक संशोधनाला प्राधान्य दिले जाणार असून, या उपक्रमाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यादृष्टीने विद्यापीठ प्रशासनाची वाटचाल सुरू आहे.

शिवाजी विद्यापीठाला नॅकचे 'ए' मानांकन मिळाले असून महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे



विद्यापीठ म्हणून विद्यापीठाची ओळख आहे. त्याचबरोबर विद्यापीठाला जागतिक दर्जाच्या उच्चशिक्षण संस्थांच्या निर्मितीसाठी नरेंद्र मोदी सरकारने आखलेल्या महत्त्वकांक्षी योजनेमध्ये देशभरातील शंभरहून अधिक नामवंत संस्थांनी सहभाग नोंदवला आहे. देशभरातून २० संस्थांची निवड केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातून शिवाजी विद्यापीठाचाही समावेश असल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यापुढेही विद्यापीठाचा जगात नावलौकिक होण्यासाठी गुणात्मक संशोधनाच्या माध्यमातून विद्यापीठ प्रशासन प्रयत्नशील राहणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात विद्यापीठाचे नवीन ॲप तयार केले जाणार आहे. लवकरच संकेतस्थळावरील सर्व माहिती ॲपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहे. विद्यापीठातील शैक्षणीक माहितीचा सर्व दस्तऐवज ऑनलाईन तयार करून नॅकच्या पुढील मानांकनाला सामोरे जाण्याची विद्यापीठ तयारी क़रीत आहे. यामध्ये जास्तीत जास्त गुणात्मक पीएच. डी. संशोधन, विद्यार्थी व प्राध्यापकांच्या संशोधन निबंधासाठी सहकार्य केले जाणार आहे.

### नॅकच्या सर्वोत्तम मानांकनासाठी संशोधनावर भर देणार



शिवाजी विद्यापीठाला नॅकचे सर्वोत्कृष्ट मानांकन मिळण्यासाठी संशोधनावर भर देवून, संख्यात्मक संशोधनापेक्षा गुणात्मक संशोधनावर भर देणार. तसेच संशोधनाच्या माध्यमातून सामाजिक बांधीलकी जपण्याचा प्रयत्न विद्यापीठ करणार आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नॅकच्या पुढीला मानांकनासाठी काम सुरू केले आहे. २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ उच्च पातळीवर नेण्याचा मानस आहे.

**प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

विद्यापीठातील सोयी-सुविधांबद्दल थेट विद्यार्थ्यांमधून प्रतिक्रिया घेऊन नॅक बेंगलोर सर्वेक्षण करणार आहे. नॅकच्या या सर्वेक्षणाची राष्ट्रीय अहवालात मार्गदर्शक उपक्रम म्हणून नोंद घेतली जाईल. भविष्यात नॅकचे 'ए प्लस प्लस' सर्वोत्तम मानांकन मिळवण्यासाठी विद्यापीठाचे सर्वोत्परी प्रयत्न सुरू आहेत.

संशोधनासाठी जाणीवजागृती करून प्रत्येक विभागाला पूरक निधी दिला जाईल. या निधीतून गुणात्मक संशोधन करून समाजिक बांधीलकी जपली जाईल. तसेच परदेशी विद्यार्थ्यांची संख्या वाढवून त्यांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. क्रीडा अधिविभागात अमुलाग्र बदल करून 'स्पोर्ट कॉम्प्लेक्स' उभारले जाणार आहे. विद्यार्थ्यांना मैदानी खेळ खेळता यावे यासाठी सिंथेटीक ट्रॅक परिसरातील मैदानाची दुरूस्ती करून सर्व सुविधांची पुर्तता केली जाईल. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी एकाचवेळी तीन विद्यापीठाचा पदभार सांभाळला, ही विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट आहे. यामध्ये मुंबई विद्यापीठ प्रशासनाला योग्य दिशा दिली, याचे कौतुक राज्यभरातून होत आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षातील रखडलेला निधी २०१८ या शैक्षणिक वर्षात देण्याचे आश्वासन सरकारने विद्यापीठ प्रशासनाला दिले आहे. त्यामुळे विद्यापीठाला भरघोस संशोधन निधी उपलब्ध होईल.

E L1 JAN 2018

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# A busy year awaits academics here for a better scorecard

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Many hits and a few misses.

That's how one can sum up Kolhapur's performance in terms of education in 2017 with chances of better implementation of schemes in the new year.

The city witnessed a rising response in terms of success and and admission rates in schools and at the university level. However, the Right to Education (RTE) admission compliance saw a bit of decline.

This was a great year for Shivaji University, Kolhapur (SUK) as it has been named one of the partners in the joint Indo-European Union (EU) project on the enhancement of the quality education. The project Enhancing Quality Assurance Management and Benchmarking Strategies in Indian Universities (EQUAM) involves Indian partners such as Indian Institute of Technology (IIT)-Madras, Jadavpur University (JU), University of Mysore, Symbiosis International (Deemed University), Mangalore University, Edulink private limited among others.

The university has already started the re-accreditation preparation and is aiming for 'A+' grade, currently in the 'A' category, in the National Assessment and Accreditation Council (NAAC) assessment in 2019.

SUK vice-chancellor Devanand Shinde said employability of the students remains one of the main focuses of the institute. Support to the research activities will be another focus area in 2018.

Another university official said the increase in the number of foreign students, establishing community radio and enhancing wireless internet facility in the campus would be the other focus areas of the institute this year.

In terms of school education, the district primary education has to work quite a lot to improve admission under the Right to Education (RTE) quota.

District primary education department officials admitted that there has been substantial decline in the number of admissions under RTE quota over last two years. However, the officials are clueless about the decline.

Subhash Chougule, district primary education officer, said the attraction of parents towards English medium schools has hampered a lot to the RTE admissions. Awareness among parents is the only key to turn the scenario.

In the school education front, Anuradha Bhosale, an education activist, and vice-chairman at Avani, a city-based NGO working for rehabilitation of migrant children, said, "The school education department has to ensure "complete transparency" when it comes to execute various schemes. There are still many students yet to get aid for the uniform, while there are schools that lack basic facilities such as electricity and classrooms."

## FROM KG CRADLE TO PG CAMPUSES

### BETTER SSC, HSC RESULTS

- 91.4% in HSC exams in February 2017
- Result was up by 3.3% against last year's 88.10%
- The division retained its second spot across nine divisions in state
- In 2015, it was third despite scoring highest-ever result of 92.13%
- In SSC, the division retained its second spot among nine divisions with 93.59 pass percentage for the March 2017 examination
- Better HSC pass-out rate results in demand for additional divisions for UG courses
- The success rate resulted in the demand for additional divisions across the affiliated colleges to Shivaji University Kolhapur offering UG courses
- The university was short of almost 10,000 seats, which was later managed through granting additional divisions across Sangli, Kolhapur and Satara districts

### CASHLESS TRANSACTIONS

The Shivaji University, Kolhapur (SUK) offered the cashless transaction system for its convocation application system which received an enormous response, according to the officials

### RTE ADMISSION IN DIVISION DECLINES

- The district primary education department could fill in merely 22% seats (730s) of the total 3,269 seats
- The officials had no intention to re-launch the admission process for vacant seats this year, as they had extended the process for four times already

### THE ROAD AHEAD

- SUK has been shortlisted for the Centre's proposed project of setting up the world class Institution of Eminence (IOE)
- Officials said as many as 32 institutes across the country have been shortlisted for the IOE
- From Maharashtra, only two universities have been – SUK and Savitribai Phule Pune University

### SAFETY FIRST FOR SCHOOLS

- Structural auditing of classrooms built before 2000
- These classrooms will be demolished or renovated in order to avoid any unfortunate incident
- This year, the district saw at least two rooftops of classrooms getting collapsed



### ALL SCHOOLS TO TURN DIGITAL

- The city and district primary education department is eyeing digital schools at the end of 2017-18 academic year
- By 2018-19 (June), Kolhapur will enter the digital school era

### WOMEN PARTICIPATION TO INCREASE IN SUK

More intake of women in its internal committees to increase capacity building

E 1 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वसंत डहाके यांचे लेखन मूल्य जोपासणारे

## शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात डॉ. प्रभा गणोरकर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

कोल्हापूर

वसंत आबाजी डहाके यांचे लेखन संतुलित, तटस्थ, आणि मानवी मूल्यांची जोपासना करणारे आहे. त्यांच्या कविता या भविष्यातील निर्मितीचा वेध घेणाऱ्या असल्याचे जाणवते, असे प्रतिपादन ज्येष्ठ मराठी साहित्यिक व समीक्षक डॉ. प्रभा गणोरकर यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित चर्चासत्रात बीजभाषणात त्या बोलत होत्या: अध्यक्षस्थानी डॉ.अशोक चौसाळकर होते.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागामार्फत वि.स.खांडेकर भाषाभवन सभागृहात शुक्रवारी 'वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य" या विषयावर एक दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्‌घाटन मानव्य विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांच्या हस्ते झाले.

यावेळी डॉ. गणोरकर म्हणाल्या, भौतिक, सामाजिक, राष्ट्रीय, वास्तव, मानवी दु:ख कमी करण्याचे संवेदनशील विचारवंतांनी केलेले प्रयत्न या सर्वांचे प्रतिबिंब व विश्लेषण त्यांच्या साहित्यामध्ये आढळते. छोट्या–छोट्या टिपणीतूनही डहाके यांची जीवनदृष्टी व्यक्त होते. एकाच वेळी अनेक गोष्टींचे संदर्भ दृश्यकलेमध्ये त्यांच्या लेखनातून पेरले जातात.



**कोल्हापूर : वसंत आबाजी डहाके यांचे साहित्य' या विषयावरील चर्चासत्रात बोलताना डॉ. प्रभा गणोरकर**

वसंत आबाजी डहाके यांनीही मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, कवी, कादंबरीकारांना अनुकूल अथवा प्रतिकूल शेरे मिळाले तरी त्यांना त्यांचे लेखन सुरूच ठेवावे लागते. साहित्य, कला याबद्दल जे जाणवते ते लिहिले पाहिजे. आपल्या लिखाणातून सामान्य नागरिकाची संवेदनशीलता जपण्याला प्राधान्य दिले पाहिजे.

डॉ. भारती पाटील म्हणाल्या, गेली पन्नास वर्षे डहाके यांनी कविता, कादंबरी आदी साहित्याची निर्मिती करुन मराठी साहित्य विश्वाला मोठे योगदान दिलेले आहे. त्यांचे साहित्य हे अस्तित्ववादी दृष्टीकोनातून आणि मार्क्सवादी दृष्टीकोनातून लिहिले गेलेले, माणसाच्या दु:खाला वाचा फोडणारे आणि माणसाचे एकाकीपण अधोरेखित करणारे आहे.

अध्यक्षस्थानावरुन बोलताना डॉ.अशोक चौसाळकर म्हणाले, डहाके यांनी आपल्या लिखाणातून समाजाचे वास्तव चित्र रेखाटले आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शंकरराव देव यांनी जी भूमिका बजावली त्यामध्ये त्यांना अनेक संघर्षांना सामोरे जावे लागले. त्यामुळे देव हे महाराष्ट्राच्या चळवळीतून आणि राजकारणातून कसे दूर फेकले गेले, याचे सूक्ष्म लेखन डहाके यांनी केले आहे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ.राजन गवस यांनी प्रास्ताविक तर डॉ.नंदकुमार मोरे यांनी आभार मानले. यावेळी डॉ.वसंत पाटणकर, डॉ. रणधीर शिंदे यांच्यासह डहाके यांच्या साहित्यावर प्रेम करणारे चाहते, शिक्षक यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कविता म्हणजे मानवी मूल्यांची अभिव्यक्ती....

कविता म्हणजे वाक्य नव्हे, तर ती मानवी मूल्यांची अभिव्यक्ती असते. त्यांचे शाश्वत मूल्यांत रुपांतर करणे हे कवीचे कार्य आहे, असे मानणारे साहित्यिक वसंत आबाजी डहाके आहेत, असे डॉ. प्रभा. गणोरकर यांनी स्पष्ट केले.

### डहाके यांच्याकडून अनेक कवितांचा चिकित्सकपणे अभ्यास

प्रभा गणोरकर म्हणाल्या, १९५० सालापासून डहाके यांचे लेखन प्रकाशित होत असले तरी त्यांना मान्यता मिळवून देणारी कविता म्हणजे योगभ्रष्ट". या कविता संग्रहामध्ये पुढील काळाच्या निर्मितीची जनुकीय गुणसूत्रे आहेत. त्यांनी मराठीमधील गेल्या सातशे वर्षात निर्माण झालेल्या कविता केवळ वाचलेल्याच नाहीत तर त्या अत्यंत चिकित्सकपणे अभ्यासलेल्या आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JAN 2018
महाराष्ट्र टाईम्स

## आजपासून कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रातर्फे एम.ए. व एम.कॉमच्या विद्यार्थ्यांसाठी नेट-सेट परीक्षा तयारी मार्गदर्शन कार्यशाळेचे



२ व ३ जानेवारी रोजी आयोजन केले आहे. सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत होणाऱ्या कार्यशाळेत डॉ. गजानन राशिंगकर, प्रा. डॉ. शशिकांत अन्नदाते, डॉ मारुती लोंढे आदी मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा निशुल्क आहे, अशी माहिती व नाव नोंदणीकरिता समन्वयक डॉ कृष्णात पाटील व महेश चव्हाण यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले आहे.

1 JAN 2018
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# व्यायाम, प्रवासासाठी वॉकिंग बाईक

## भारती विद्यापीठाच्या विद्यार्थिनींचे पर्यावरणपूरक संशोधन

**कोल्हापूर / संतोष पोवार**

विधायक

चालणे हा सर्वोत्तम व्यायाम मानला जातो; पण बदलत्या जीवनशैलीत व्यायामाला वेळ नाही आणि वाहनाने प्रवास केल्याशिवाय पर्याय नाही. व्यायाम आणि प्रवास यांचा मेळ साधला तर... या विचारातून साकारली वॉकिंग बाईक. भारती विद्यापीठाच्या माधवी वडाम, प्राजक्ता पोवार, प्रशाली शिंदे या तीन विद्यार्थिनींनी प्रा. एस. एस. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य आणि पर्यावरणपूरक बाईक तयार केली आहे.

आजकालच्या धावपळीच्या जीवनात माणूस स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे विसरत आहे. नियमित व्यायामाला वेळ न मिळाल्याने आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. चालणे हा सहजपणे करता येणारा एक चांगला व्यायाम मानला जातो. डॉक्टर चालण्याचा सल्ला देतात; पण वेळ काढून वॉकिंगला जाणे अनेकदा अवघड बनते. कामानिमित्त चालणेही बंद झाले आहे. प्रत्येक जण स्वतःच्या किंवा सार्वजनिक वाहनाने प्रवास करू लागला आहे. यामुळे माणसाच्या आरोग्यावर परिणाम होत आहेच, त्याबरोबरच वाढत्या वाहनांमुळे प्रदूषण वाढत असून, पर्यावरणाचे नुकसान होत आहे. तसेच इंधन साठा संपत असून ही एक जागतिक समस्या बनणार आहे.



**प्राजक्ता पोवार**



**प्रशाली शिंदे**



**माधवी वडाम**

माणसाच्या आरोग्याबरोबरच सृष्टीचे आरोग्य जपणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न सुरू आहेत. यामध्ये भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमधील इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग डिपार्टमेंटच्या विद्यार्थिनींचाही

▶▶ पान ७ वर



### अशी असेल बाईक

या बाईकच्या दोन चाकांमध्ये ट्रेडमिल असून, ब्रेक असून हॅण्डेलला स्क्रीन आहे. त्यावर हार्टबिट आणि वजन मापक असेल. त्यामुळे हृदयाचे ठोके, वजन किती कमी झाले, हे कळेल. बाईकला मोटर आणि बॅटरी असल्यामुळे ट्रेडमिलवर चालल्यानंतर बाईक चालण्याबरोबरच बॅटरी चार्ज होईल. तसेच चालून थकल्यास बॅटरीवर बाईक चालेल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
E 11 JAN 2018
पुण्यनगरी

# व्यायाम, प्रवासासाठी वॉकिंग बाईक

**(पान १ वरून)** सहभाग झाला आहे. या तीन विद्यार्थिनींनी वॉकिंग बाईकचे संशोधन पूर्ण केले आहे. यासाठी ट्रेडमिल वापरण्यात आले आहे. त्यामुळे ट्रेडमिलवर चालण्याचा व्यायाम होईलच. त्याबरोबरच बाईकही चालेल आणि बॅटरीही चार्ज होईल. चालून थकल्यानंतर बाईक चालण्यासाठी या बॅटरीचा उपयोग होणार आहे. त्यामुळे इंधनाचा खर्च वाचेल. या बाईकचा वेग, आकार सर्वसामान्य बाईकसारखाच असून ब्रेकिंग सुविधा आहे. हे संशोधन पूर्ण झाले असून, त्याचा व्यवहारात वापर करण्यासाठी पेटंट घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठीच विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे लवकरच ही पर्यावरणपूरक, आरोग्यरक्षक बाईक बाजारपेठेत येण्याची शक्यता आहे.



**पेटंटसाठी प्रयत्न**

वॉकिंग बाईकचा प्रोजेक्ट पूर्ण झाला आहे. प्राथमिक स्वरूपात आता ही बाईक तयार झाली आहे. त्याचा व्यावहारिक वापर सुरू करण्याआधी पेटंट घेण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने सध्या प्रयत्न सुरू आहेत. पेटंट मिळाल्यानंतर एक चांगले संशोधन लोकांच्या उपयोगात आणल्याचे समाधान मिळेल.

**- प्रा. एस. एस. पवार**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JAN 2018
लोकमत

# संशोधनाचा वापर कौशल्याने करा : गुरव

## मगदूम अभियांत्रिकीमध्ये बक्षीस वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

जयसिंगपूर : संशोधकाचे सर्वच गोष्टींवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. योग्य निरीक्षणातूनच संशोधकांनी ज्ञान व संशोधनाचा वापर व्यवहारामध्ये कौशल्यपूर्णरित्या करावा, असे प्रतिपादन तहसीलदार गजानन गुरव यांनी केले.

येथील डॉ. जे. जे. मगदूम अभियांत्रिकीमध्ये आविष्कार २०१७ स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी तहसीलदार गुरव बोलत होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे को-ऑर्डीनेटर डॉ. ए. एम. गुरव यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासू व योग्य मार्गदर्शन केले.

स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत २७५ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत मानव्यशास्त्र व भाषा विभागात किर्ती झुराळे, सौरभ गायकवाड, रमिजराजा धनवडे, वाणिज्य व व्यवस्थापन कायदा विभागात प्रियांका पुरोहित, तनजीमा मुजावर, श्वेता पाटील, मूलभूत विज्ञान विभागात एस. बाळू मुल्लाणी, कविता शिंदे, मंजुळा सोमाणे, स्नेहल गुळागंजी, कृषभ व पशुसंवर्धन विभागात आकाश पाटील, नम्रता विभूते, तमन्ना पटेल, जिनेशकुमार चौहान, विज्ञान व तंत्रज्ञान विभागात यश आंबोळे, शिवप्रसाद शिंत्रे, ऐश्वर्या पाटील, रचना कुलकर्णी, वैद्यक व औषध निर्माणशास्त्र विभागात संभाजी मासाळ, पूजा जाधव, असलम सादा, मिनल एम यांनी अनुक्रमे यश मिळविले.

मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत, एस. आर. महाडिक, प्रा. व्ही. जे. खोत, प्रा. पी. पी. पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 JAN 2018

पुढारी

# सूरज मानेची वेस्टझोन इंटर युनिव्हर्सिटी व्हॉलीबॉलसाठी निवड

जयसिंगपूर : प्रतिनिधी



जयसिंगपूर महाविद्यालयचा आदर्श खेळाडू सूरज माने (बी.ए.भाग २) याची जबलपूर येथील राणी दुर्गावती विश्व विद्यालय येथे होणाऱ्या वेस्टझोन इंटर युनिव्हर्सिटी व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी निवड झाली. स्पर्धेपूर्वी तयारीसाठी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे स्पर्धा कॅम्पमसाठी माने यास कॉलेजतर्फे पाठविले. त्याला संस्थेचे चेअरमन पद्माकर पाटील, सचिव सुभाष आडदांडे, प्राचार्य बी. एम. राठोड, क्रीडा प्रशिक्षक महादेव सूर्यवंशी उपस्थित होते.

01 JAN 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



माजी महापौर आर. के. पोवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष जयकुमार शिंदे, विश्वविजय खानविलकर, बंटी सावंत, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, एनसीसी विभागप्रमुख डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. विलास शिंदे, शिक्षण उपसंचालक एम. के. गो[illegible], शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आर्य समाज एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष ॲड. दिलीपसिंह पाटील - कौलवकर, डॉ. वी. वी. देशिंगकर, भोगावती कारखान्याचे संचालक ए. डी. चौगले, गोकुळचे संचालक पी. डी. धुंदरे.

# शिवाजी विद्यापीठात साकारणार 'गुगल'ची अद्ययावत प्रयोगशाळा

## सहयोगी करार होणार : अँड्राईड प्रणाली, मोबाईल अॅपबाबतचे संशोधन

संतोष मिठारी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बदलत्या तंत्रज्ञानामुळे स्मार्टफोन हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. दैनंदिन व्यवहारांतील अनेक कामांसाठी या स्मार्टफोनवरील मोबाईल अॅपचा वापर वाढला आहे. या अॅपसह अँड्राईड प्रणालीबाबतचे नवनवीन संशोधन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात नववर्षात 'गुगल'च्या सहकार्याने अद्ययावत प्रयोगशाळा साकारण्यात येणार आहे. याबाबत विद्यापीठ आणि गुगलमध्ये जानेवारीमध्ये सहयोगी करार होणार आहे.

इंटरनेटशी निगडित सेवा, उत्पादने आणि तंत्रज्ञान पुरविणाऱ्या 'गुगल' या कंपनीसमवेतच्या कराराचा मुख्य उद्देश हा संगणक शास्त्राच्या प्राध्यापकांना मोबाईल अॅप, नेव्हिगेशन, अँड्राईड प्रणाली, आदी सुविधांबाबतचे तंत्रज्ञान, संशोधनाबाबत प्रशिक्षण देणे. या प्राध्यापकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक गुगलच्या उत्पादनांबाबत प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविणे असा आहे. या कराराच्या अनुषंगाने ऑक्टोबर २०१७ पासून विद्यापीठाकडून कार्यवाही सुरु झाली आहे. त्यात गुगलने विद्याशाखा विकास कार्यक्रमांची व्यवस्था केली आहे.




विद्यापीठातील संगणकशास्त्र अधिविभागाने प्रा. डॉ. आर. के. कामत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांसाठी गुगल पुरस्कृत 'अँड्राईड फंडामेंटल डेव्हलपमेंट' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यशाळा दोनवेळा घेतली आहे. त्यामध्ये गुगलच्या तंत्रज्ञांनी शंभर प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले आहे.

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाने 'मास्टर्स इन कॉम्प्युटर सायन्स'मध्ये अँड्राईड प्रणालीच्या मूलभूत घटकांबाबतचा ६० तासांचा अभ्यासक्रम सुरु केला आहे. त्याची सुरुवात विद्यापीठाच्या यावर्षीच्या दुसऱ्या सत्रापासून झाली असून यासाठी ६० विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत.

या अभ्यासक्रमासाठी व्हिडिओ ट्युटोरिअल्स, पुस्तके असे विविध शैक्षणिक साहित्य 'गुगल'ने उपलब्ध करून दिले आहे. या उपक्रमाचे समन्वयक म्हणून विद्यापीठातील संगणक शास्त्रातील डॉ. कविता ओझा काम पाहत आहेत.

करारातील पुढील टप्प्यात विद्यापीठात अँड्राईड प्रणालीबाबतच्या नवनवीन संशोधनासाठी अद्यावत प्रयोगशाळा साकारण्यात येणार आहे. त्यासह विद्यापीठातील संगणकशास्त्र विभागामधील १ लाख ३० हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

### विद्यापीठाच्या 'ग्लोबल भरारी'ला बळ

विविध उपक्रमांच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ ग्लोबल भरारी घेत आहे. त्याला 'गुगल'समवेतच्या या सहयोगी करारामुळे आणखी बळ मिळणार असल्याचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. ते म्हणाले, अँड्राईड प्रणाली, मोबाईल अॅपसह संगणकशास्त्रातील संशोधनाबाबत गुगलने ग्रामीण भागातील आपल्या विद्यापीठाबरोबर काम करण्याचा देशातील पहिलाच उपक्रम आहे. विद्यापीठाने संगणकशास्त्र आणि माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात (आयटी) केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळेच 'गुगल'ने या उपक्रमासाठी निवड केली आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना बदलत्या तंत्रज्ञानाचे अद्ययावत ज्ञान मिळणार आहे. संगणक शास्त्रामध्ये जगाच्या नकाशावर काम करण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्यांमधील रोजगार क्षमता वाढणार आहे.

### अॅप, वेब डेव्हलपर क्षेत्रात रोजगाराची संधी

मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे अँड्राईड प्रणालीस अनुसरुन मोबाईल अॅप बनविण्याच्या क्षेत्रात मोठ्या रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत, असे संगणकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी सांगितले. ते म्हणाले, 'गुगल'ने भारतामध्ये तीन लाख गुगल अँड्रॉईड डेव्हलपर तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. विद्यापीठासमवेत गुगलच्या होणाऱ्या सहयोगी करारामुळे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील युवक-युवतींना अॅप डेव्हलपर, वेब डेव्हलपर या क्षेत्रात रोजगाराची संधी मिळणार आहे. जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हा सहयोगी करार होईल.

